दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




* वर्ष : ०१ ले * | * अंक : ४८ * | * शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६ * | * जालना * | *किंमत : २ रूपये * | *पृष्ठे : ४ *

◎Volume 01◎ | ◎ Issue 48 ◎ | ◎Friday, Date : 18 September 2026 ◎ | ◎ Jalna ◎ | ◎Price Rs. 2◎ | ◎Pages 4 ◎

## मराठवाडा मुक्तीसंग्रामात जालना जिल्ह्याचे योगदान महत्त्वाचे : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना : मराठवाड्याच्या मुक्तीसाठी झालेल्या ऐतिहासिक संग्रामात जालना जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. या लढ्यातील हुतात्मे, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाचे स्मरण आजही जालना जिल्ह्याच्या इतिहासात अभिमानाने केले जात असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त जालना शहरातील टाऊन हॉल येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी



जनतेला उद्देशून शुभेच्छा संदेश देताना त्या बोलत होत्या. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार हिकमत उढाण, माजी आमदार राजेश टोपे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया, महानगर पालिका आयुक्त अंजली शर्मा, पोलिस अधिक्षक तेगबीर सिंह संधु, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी



उपजिल्हाधिकारी शशीकांत हदगल, अपर पोलीस अधिक्षक विक्रम साळी, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल पुढे म्हणाल्या की, मराठवाडा मुक्तीसंग्रामात जालना जिल्ह्याचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. परतूर येथे झालेल्या महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाला या लढ्याच्या इतिहासात विशेष महत्त्व आहे. कोलते पिंपळगावकरांनी २२ जून १९४८ रोजी रझाकारांविरुद्ध सशस्त्र लढा दिला. जिल्ह्यातील विविध ठिकाणी जंगल सत्याग्रह ही झाले.

नागरिकांना शासनाच्या विविध सेवा, योजना, अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती घरपोच (पान ३ वर)

## जालना महापालिका बरखास्त करा; मुख्यमंत्र्यांकडे मागणी करणार नगरसेवकांमधील वाद-विवादामुळे नागरिकांमध्ये नाराजी : खा. डॉ.काळे

काळे जालना/प्रतिनिधी : जालना महानगरपालिकेतील कारभारावरून काँग्रेसचे खासदार डॉ. कल्याणराव काळे यांनी थेट निशाणा साधला आहे. महानगरपालिकेतील नगरसेवकांमध्ये सातत्याने वाद-विवाद व भांडणे सुरू असून, त्याचा परिणाम शहराच्या विकासकामांवर आणि नागरिकांच्या प्रश्नांवर होत असल्याचा आरोप त्यांनी केला. 'जालना महानगरपालिका बरखास्त करावी,' अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे करणार असल्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी गुरुवारी स्पष्ट केले. जालना शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने नवनियुक्त पदाधिकार्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन गुरुवारी (दि. १७) मामा चौक, जुना जालना येथील स्वास्तिक भोजनालयात करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. नवनियुक्त पदाधिकार्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. खासदार डॉ. कल्याण काळे म्हणाले की, महानगरपालिका ही शहराच्या विकासाचे



केंद्र असते. नागरिकांच्या मूलभूत सुविधा, रस्ते, पाणी, स्वच्छता आणि इतर प्रश्नांवर प्रभावीपणे काम होणे अपेक्षित असताना महापालिकेतील अंतर्गत वादांमुळे नागरिकांमध्ये नाराजी निर्माण होत आहे. शहराच्या विकासासाठी महापालिकेने जबाबदारीने आणि प्रभावीपणे काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांनी नवनियुक्त पदाधिकार्यांना मार्गदर्शन करताना 'जालना शहर काँग्रेसला नवसंजीवनी देण्यासाठी संघटनेची नव्याने बांधणी करण्यात येणार आहे,' असा निर्धार व्यक्त केला. शहरातील प्रत्येक प्रभागात काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविण्यासोबतच सामान्य नागरिकांशी थेट संपर्क (पान ३ वर)

## प्रबोधनकार ठाकरे यांना जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



जालना/प्रतिनिधी :- केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात नायब तहसीलदार, सतिश तायडे, यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सहायक महसुल अधिकारी दिपाली राऊत (वानखडे), गजानन खांडेभराड, शिवाजी खांडेभराड, राधकिसन सानप, ज्ञानेश्वर गोरे, पांगरकर, सुनिल काळुंके आदि अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## स्मारक अस्वच्छ, निवेदन स्वीकारायला कर्मचारी नाही; अभाविपचा मनपा प्रशासनावर संताप

नवनाथ गव्हाणे : बदनापूर / प्रतिनिधी जालना : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जालना शाखेच्या कार्यकर्त्यांनी हुतात्मा जनार्दन मामा नागपूरकर यांच्या स्मारकास अभिवादन करण्यासाठी भेट दिली. मात्र, स्मारक परिसरात अस्वच्छता आणि कचरा आढळून आल्याने कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. महापुरुषांच्या स्मारक परिसराची दुरवस्था पाहून अभाविपच्या कार्यकर्त्यांनी प्रशासनाची वाट न पाहता स्वतःच स्वच्छता मोहीम राबवली. परिसरातील कचरा गोळा करून तो महानगरपालिका



कार्यालयासमोर आणून ठेवण्यात आला. त्यानंतर स्मारक परिसरातील अस्वच्छतेबाबत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कार्यकर्ते महानगरपालिका कार्यालयात निवेदन देण्यासाठी गेले. मात्र, निवेदन स्वीकारण्यासाठी कार्यालयात कोणताही कर्मचारी उपलब्ध नसल्याने कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या कारभाराचा निषेध करत महानगरपालिका कार्यालयासमोर निदर्शने सुरू केली. सुमारे दोन तास निदर्शने करूनही निवेदन स्वीकारण्यासाठी जबाबदार कर्मचारी उपलब्ध न झाल्याने कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र संताप व्यक्त केला. अखेर महानगरपालिकेच्या उपायुक्त नंदा गायकवाड यांनी घटनास्थळी येऊन अभाविपच्या कार्यकर्त्यांकडून निवेदन स्वीकारले. हुतात्म्यांच्या तसेच महापुरुषांच्या स्मारकांची स्वच्छता व देखभाल राखणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, स्मारक परिसरात अस्वच्छता आढळणे आणि निवेदन स्वीकारण्यासाठीही कर्मचारी उपलब्ध नसणे, ही बाब अत्यंत खेदजनक असल्याचे अभाविपच्या कार्यकर्त्यांनी सांगितले. या प्रकाराचा अखिल (पान ३ वर)

## जिल्हा व सत्र न्यायालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न

जालना/प्रतिनिधी : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त जिल्हा व सत्र न्यायालय जालना येथे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती मृदूला भाटिया यांच्या हस्ते ध्वजारोहण साजरे करण्यात आले तद्पूर्वी जालना तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालयात वरिष्ठस्तर दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.पी. दिवाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती एन.एस. शेख, श्रीमती बी.एस. गारे, आर. बी. पारवेकर, वर्षा निहलानी, जी. आर. ढेपे, सदस्य सचिव नितेश बंडगर, मुख्य न्याय दंडाधिकारी एस. एम. पाडोळीकर, न्यायाधीश ए. आर. नागोरी, न्यायाधीश एच. वाय. कावले, ज्येष्ठ विधिज्ञ ड विनायकराव चिटणीस, ड स्वप्नील खराबे, जिल्हा सरकारी अभियोक्ता ड बाबासाहेब इंगळे, सहायक जिल्हा सरकारी अभियोक्ता ड जयश्री बोराडे, ड भारत खांडेकर, ड अशोक मते, ड दिपक कोल्हे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड परमेश्वर गडगीळे, उपाध्यक्ष ड अशोक वाहूळकर, सचिव विनोद कुलकर्णी, सह सचिव ड शिवनाथ जऱ्हाड, ड अरविंद मुरमे आदिंसह जिल्हा वकील संघाचे सदस्य यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

तसेच यावेळी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने घेतलेल्या रक्तदान शिबीरातील १०२ रक्तदात्यांपैकी प्रातिनिधीक स्वरुपात प्रमाणपत्रांचे वाटप व आयोजित क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.

## पत्रकार आशिष रसाळ यांना जिल्हा मराठी पत्रकार संघाची भावपूर्ण श्रद्धांजली



जालना/प्रतिनिधी : जालना येथील तरुण, होतकरू पत्रकार आशीष रसाळ यांचे बुधवारी, दि. १६ रात्री हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले आहे. या दुःखद निधनाबद्दल जालना जिल्हा मराठी पत्रकार संघाने शोक करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. जालना जिल्हा मराठी पत्रकार संघाची आज शुक्रवारी दुपारी तातडीची बैठक संघाचे अध्यक्ष फकिरा देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार भवनात पार पडली. या बैठकीत पत्रकार संघाचे प्रदेश प्रतिनिधी, ज्येष्ठ पत्रकार अब्दुल हाफिज यांनी पत्रकार आशिष रसाळ यांच्या निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. जालन्यातील तरुण पत्रकार, उत्तम निवेदक, उत्कृष्ठ वक्ता म्हणून आशिष रसाळ यांनी आपली ओळख निर्माण केली

## मानवी रांगोळीद्वारे 'सेवा संकल्प अभियान' ची सुरुवात शुभारंभ

जालना : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील २५ वर्षांच्या कारकिर्दीनिमित्त तसेच सामान्य नागरिकांपर्यंत विविध शासकीय सेवा आणि लोककल्याणकारी योजनांचा लाभ जलदगतीने पोहोचवण्यासाठी राज्य शासनाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभर 'सेवा संकल्प अभियान' राबवण्याचा निर्णय घेतला आहे. जालना जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' या देशव्यापी जिल्हास्तरीय अभियानाची सुरुवात आज येथील जिल्हा परिषदेत मानवी साखळी व रांगोळी उपक्रमाच्या माध्यमातून उत्साहात करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारीया, परिविक्षाधीन अधिकारी आर. रंगामंजू, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले, मुख्य लेखा वित्त अधिकारी राधाकिसन राऊत यांच्यासह जिल्हा परिषदेतील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने (पान ३ वर)

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त गुरूकुलम् शिशुवाटीका येथे उत्साहात ध्वजारोहण!

नवनाथ गव्हाणे बदनापूर / प्रतिनिधी : मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यवीरांच्या शौर्याला, त्यागाला व बलिदानाला अभिवादन करत गुरूकुलम् शिशुवाटीका, बदनापूर येथे गुरुवारी (दि. १७) मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष भगवानराव मात्रे यांनी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामाची




पार्श्वभूमी सांगितली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते. निजामाच्या राजवटीत मराठवाड्यातील जनतेला मोठ्या संघर्षाला सामोरे जावे लागले. अखेर स्वातंत्र्यसैनिकांच्या लढ्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. त्यामुळे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाड्याच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले. व्यवस्थापक नवनाथ गव्हाणे यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील (पान ३ वर)



धोपटेश्वर येथील तुकाराम पाटील दाभाडे यांच्या घरी पारंपरिक पद्धतीने गौरीचे उत्साहात आगमन झाले. यावेळी घरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, महिलांनी गौरीचे विधिवत पूजन करून स्वागत केले.

## सोमवारपासून जालना शहरात सिटी बस धावणार; आमदार अर्जुन खोतकर यांच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी । जालना : जालना शहरातील नागरिकांसाठी दिलासादायक बातमी असून, सोमवारपासून शहरात सिटी बस सेवा सुरू होणार असल्याची माहिती शिवसेना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली. आज १७ सप्टेंबर रोजी आमदार अर्जनराव खोतकर यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रक सपकाळ मॅडम व आगार प्रमुख जैवळ यांच्यासोबत बैठक घेऊन जालना शहरात शहर बस वाहतूक सुरू होणे कसे महत्वाचे आहे हे



बस स्टॅन्ड –भोकरदन नाका –जालना बाजार समिती –कन्हैया नगर –गणपती नेत्रालय –जे एस महाविद्यालय –एस आर पी एफ – मंठा चौफुली – जिल्हाधिकारी कार्यालय – मोतीबाग विशाल कॉर्नर – एमआयडीसी – नागेवाडी काकडे पेट्रोल पंप , बस स्टँड – विशाल कॉर्नर – मोतीबाग– जिल्हाधिकारी कार्यालय – अंबड चौफुली – मंठा चौफुली – रामनगर साखर कारखाना बस स्टॅन्ड– मुथा बिल्डिंग – मंमादेवी – गांधी चव्हाण – रेल्वे स्टेशन – नूतन वसाहत – अंबड चौफुली – इंदेवाडी पाण्यात टाकी

निदर्शनास आणून दिले व तातडीने बैठकीदरम्यान सोमवारपासून जालना शहरात सिटी बस सेवा सुरु करण्यासाठी सुचणार केल्या. शहरातील नागरिक, विद्यार्थी ,कामगार शेतकरी,प्रवासाची गैरसोय लक्षात घेऊन सिटी बस सेवा सुरू करण्यासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसेच जिल्हाधिकारी जालना,पोलीस अधीक्षक यांच्याशी संपर्क साधून पाठपुरावा केला. त्यांच्या या महत्त्वाकांक्षी प्रयत्नांनंतर सोमवारपासून सिटी बस सेवा सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे आमदार (पान ३ वर)

## जिल्हा परिषदेत मानवी रांगोळीद्वारे 'सेवा संकल्प अभियान' ची सुरुवात

जालना/प्रतिनिधी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील २५ वर्षांच्या कारकिर्दीनिमित्त तसेच सामान्य नागरिकांपर्यंत विविध शासकीय सेवा आणि लोककल्याणकारी योजनांचा लाभ जलदगतीने पोहोचवण्यासाठी राज्य शासनाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभर 'सेवा संकल्प अभियान' राबवण्याचा निर्णय घेतला आहे. जालना जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' या देशव्यापी



जिल्हास्तरीय अभियानाची सुरुवात आज येथील जिल्हा परिषदेत मानवी साखळी व रांगोळी उपक्रमाच्या माध्यमातून उत्साहात करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारीया, परिविक्षाधीन अधिकारी आर. रंगामंजू, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले, मुख्य लेखा वित्त अधिकारी राधाकिसन राऊत यांच्यासह जिल्हा परिषदेतील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने राष्ट्रीय प्रतिके आणि विकसित (पान ३ वर)

# संपादकीय

## जबाबदारी

महाराष्ट्राचा प्रशासकीय लौकिक गोपट्ट्यातील राज्यांशी स्पर्धा करू लागण्यामागील एक महत्त्वाचे कारण राज्य लोकसेवा आयोगात सुरू झालेली दुकानदारी हे आहे. एकेकाळी राज्यातील सर्व सेवाभरती या लोकसेवा आयोगामार्फत होत असे आणि त्यात गुणवत्तेत तडजोड केली जात नसे. त्याचे महत्त्वाचे श्रेय तेव्हाच्या नेक अधिकार्यांस जाते. आपल्या पदाचे इमान राखणारे एकापेक्षा एक उत्तम अधिकारी प्रशासनात होते आणि राजकीय नेतृत्वही अशांची कदर करत असे. त्यावेळी राज्य प्रशासनाच्या लौकिकाची तुलना उदाहरणच द्यावयाचे तर मुंबईच्या आणि देशाच्या क्रिकेट संघाशी करता येईल. एकेकाळी ज्या प्रमाणे राष्ट्रीय क्रिकेट संघापेक्षा मुंबईच्या क्रिकेट संघात स्थान मिळवणे अवघड मानले जात असे त्या प्रमाणे महाराष्ट्राचे प्रशासन हे राष्ट्रीय प्रशासकीय अधिकार्यांसमोरही आब राखून होते. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार इत्यादींनी ही प्रशासकीय घडी कधी विस्कटू दिली नाही. तथापि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू शशिकांत कर्णिक यांच्यासारख्या विधिनिषेधशून्य व्यक्तीच्या हाती लोकसेवा आयोगाची धुरा दिली गेली आणि या महत्त्वाच्या संस्थेचा र्हास सुरू झाला. तो अखंड सुरू असून आज तर या संस्थेची इभ्रत पार रसातळास गेल्याचे दिसते. चोराच्या हाती जामदारखान्याच्या किल्ल्या दिल्यावर आणखी काय होणार; हे खरेच. त्याचमुळे राज्यभरातील विद्यार्थी वर्गात कमालीचा रोष आहे. तो कसा व्यक्त करावा याचा धडा 'जंतर-मंतर'ने घालून दिला असून राज्यातील विद्यार्थीही त्याच मार्गाने गेल्यास आश्चर्य वाटू नये. ही दिल्लीतील इतिहासाची पुनरावृत्ती महाराष्ट्रात होऊ नये अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रामाणिक इच्छा असेल तर लोकसेवा आयोगाच्या साफसफाईसाठी नेमलेल्या व्ही. राधा यांच्या नेतृत्वाखालील कृतीगटास त्यांनी यासाठी सर्वाधिकार द्यावेत आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या शिफारशींची तंतोतंत अंमलबजावणी करण्याचे धाडस दाखवावे. येथे 'धाडस' हा शब्दप्रयोग करण्याचे कारण म्हणजे लोकसेवा आयोगाच्या बदअमलात खुद्द फडणवीस यांच्या आसपासच्या अनेकांचे गुंतलेले हितसंबंध. ज्या प्रमाणे चांगले रस्ते हे कंत्राटदार आणि त्यांच्या आडून आपले अर्थकारण साधणारे राजकारणी यांच्या मुळावर येतात तद्वत सरकारातील पारदर्शी भरती प्रक्रिया अनेकांच्या उत्पन्नावर गदा आणते. हे कसे होते याचे निलाजरे उदाहरण कर्णिक यांच्या काळात जे घडले त्यात आहे. लोकसेवा आयोगात १९९९ साली पोलीस उपनिरीक्षक आणि अन्य पदांच्या भरती प्रक्रियेत मोठा घोटाळा उघडकीस आला. ते प्रकरण इतके गंभीर होते की कर्णिक यांच्या समवेत तत्कालीन मंत्र्याच्या सचिवासह अन्य पाच जणांस तुरुंगवास भोगावा लागला. त्यावेळच्या भरती प्रक्रियेत ३९८ उमेदवारांच्या उत्तर पत्रिकेत फेरबदल केल्याचा आरोप या सर्वांवर होता. त्यातून पुढे अनेकांस शासनही झाले. तेथून सुरू झालेली आयोगाची अधोगती इतकी तीव्र की आता संबंधितांस उत्तरपत्रिकांत छेडछाड करावी लागत नाही. आता प्रश्नपत्रिकाच फोडल्या जातात. म्हणजे पूर्वी एकटा-दुकटा अधिकारी शेण खात असे. आता ते सामुदायिकरीत्या खाऊन 'श्रावणी' साजरी केली जाते. परिणामी एक वर्ष असे जात नाही की ज्यात परीक्षा घोटाळा झालेला नाही वा होत नाही. शिवाय पेपरफुटी कमी म्हणून की काय चुकीचे प्रश्न, तपशिलातील गोंधळ इत्यादी अनागोंदी सोबतीला आहेच. त्यामुळे परीक्षार्थींत कमालीची खदखद असून तो रोष कधी आणि कसा व्यक्त होणार इतकाच काय तो प्रश्न आता उरलेला आहे. या विषयावर प्रक्षोभ टाळण्याचा शेवटचा मार्ग म्हणजे व्ही. राधा यांच्या नेतृत्वाखालील हा कृतीगट.

पेपरफुटीचे कारण मुळापाशीच उखडून टाकणे, लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचे निश्चित वेळापत्रक जाहीर करणे, कोणत्या पदाच्या किती जागा रिक्त आहेत, किती पदांवर नियुक्ती केली जाणे अपेक्षित आहे इत्यादी तपशील वेळच्या वेळी जाहीर करणे इत्यादी काही प्राथमिक शिफारशी या कृतीगटाने केलेल्या आहेत. ही प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. सध्या व्ही. राधा आणि समिती सदस्य राज्यभर दौरा करणार असून विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. पुण्यातील अशा चर्चेत १२ सप्टेंबरास सुमारे ६०० विद्यार्थ्यांनी या समितीसमोर आपले मन मोकळे केले. नंतर नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोकण, नाशिक अशा सर्व ठिकाणी हा कृतीगट विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेईल. त्याची गरज होती. कारण सत्ताधीशांस आज विद्यार्थ्यांसाठी वेळ नाही. दिल्लीपासून गल्लीपर्यंतचे सत्ताधीश कंत्राटे देण्याचे नवनवीन मार्ग शोधण्यात मग्न असल्याने विद्यार्थ्यांसाठी त्यांच्याकडे वेळ असणार तरी कसा, हेही खरेच. आता तर सणासुदीचा काळ. आपल्या चेल्याचपाट्यांस खूश करण्यासाठी गल्लोगल्लीतील मंडळांस वा मंडपांत भेटी देण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य या सत्ताधीशांस पार पाडावयाचे असल्याने विद्यार्थी हिताकडे दुर्लक्ष होणे साहजिक. अशा परिस्थितीत या संदर्भात दुसरा उत्तम पर्याय म्हणजे व्ही. राधा यांच्यासारख्या अधिकार्यांकडे ही जबाबदारी सुपूर्द करणे. तशी ती सुपूर्द करून फडणवीस यांनी एक पाऊल पुढे टाकले.

# श्री गणेशाय नम : गणपतीचा नेमका काळ कोणता?



गणेश किंवा गणपती संकल्पनेचा इतिहास आणि उगम सुमारे ३,५०० ते ४,००० वर्षे किंवा त्याहूनही जुना मानला जातो. ही संकल्पना एकाएकी निर्माण न होता, शतकानु शतके झालेल्या सांस्कृतिक बदलांमधून विकसित झाली आहे. वैदिक काळ (इ.स.पूर्व १५०० ते १२००)ऋग्वेदामध्ये 'गणपति' किंवा 'ब्रह्मणस्पती' असा उल्लेख आढळतो. त्या काळी 'गण' म्हणजे समूहाचा किंवा देवदूतांच्या टोळीचा प्रमुख (अधिपती) असा त्याचा अर्थ होता. तो ज्ञान आणि बुद्धीचा अधिपती मानला जात असे ऋग्वेदात गणानां त्वा गणपतिं हवामहे... हा प्रसिद्ध मंत्र आढळतो. येथे 'गणपती' या शब्दाचा अर्थ 'गणांचा (समूहाचा) प्रमुख किंवा रक्षक' असा आहे. वैदिक काळात ही संकल्पना प्रामुख्याने बृहस्पती किंवा इंद्राशी जोडलेली होती, पण आज आपण ज्या स्वरूपात गणेशाला पूजतो, त्या रूपाची सुरुवात येथून झाली.

**इ.स.पूर्व ७ वे ते ४ थे शतक -** 'मानवगृह्यसूत्र' आणि 'याज्ञवल्क्य स्मृती' सारख्या ग्रंथांमध्ये 'विनायक' नावाच्या चार अमूर्त शक्तींचा (किंवा आत्म्यांचा) उल्लेख आढळतो, जे मानवी जीवनात अडथळे निर्माण करायचे. नंतरच्या काळात हे चार विनायक एकत्र येऊन एकच 'विनायक' (विघ्नहर्ता आणि विघ्नकर्ता) बनले

**गुप्त काळ आणि पुराण काळ (इ.स. ४ थे ते ६ वे शतक)**

आज आपण ज्या स्वरूपात गणपतीला पाहतो (गजमुख, लंबोदर, विघ्नहर्ता), त्या स्पष्ट आणि आधुनिक संकल्पनेची स्थापना गुप्त साम्राज्याच्या काळात झाली. या काळात गणेश ही स्वतंत्र आणि मुख्य देवता म्हणून प्रस्थापित झाली. महाभारत लिहिणारे 'लेखनिक' म्हणूनही गणेशाची संकल्पना याच काळात दृढ झाली. पुढे 'गणेश पुराण' आणि 'मुद्गल पुराण' यांसारख्या ग्रंथांमध्ये गणेशाच्या कथा आणि तत्त्वज्ञान सविस्तर मांडले गेले. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते गणपतीच्या उपासनेचा इतिहास केवळ १३०० वर्षांपुरता मर्यादित नाही; तो त्यापेक्षा किमान एक हजार वर्षे अधिक जुना आहे. म्हणजे आजपासून जवळ जवळ २५०० वर्षे जुना . राजवाड्यांनी हा मुद्दा १९०५ मध्ये सरस्वती मंदिर मासिकात प्रसिद्ध केलेल्या लेखात मांडला होता.

**राजवाड्यांचा मुख्य युक्तिवाद**

राजवाड्यांनी उपलब्ध प्राचीन वाङ्मयातील उल्लेख एकत्र करून गणपतीच्या प्राचीनत्वाचा मागोवा घेतला.

बाणभट्टाचे 'हर्षचरित' - इ.स. ७व्या शतकातील या ग्रंथात गणपतीसंबंधी उल्लेख आढळतो. त्यामुळे गणपतीची उपासना त्या काळात निश्चितच अस्तित्वात होती. 'गाथासप्तशती' - सातवाहनकालीन प्राकृत गाथासंग्रहात गणपतीच्या सोंडेचा उल्लेख असल्याचे राजवाडे दाखवतात. हा उल्लेख अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण तो गणपतीच्या प्रतिमेची कल्पना बरीच जुनी असल्याचे सूचित करतो. आपस्तंबांच्या परंपरेतील मंत्र -

**तत्पुरुषाय विद्महे वक्रतुंडाय धीमहि**

या स्वरूपातील गणेशमंत्राचा संदर्भ देऊन राजवाडे गणपतीची संकल्पना आणखी प्राचीन काळात नेतात. मग नेमका काळ किती? राजवाड्यांचा निष्कर्ष साधारण असा होता की गणपतीची उपासना इ.स.पूर्व काळातच प्रचलित होती आणि ती किमान सुमारे २३००-२५०० वर्षे जुनी असावी. मात्र येथे एक महत्त्वाचा ऐतिहासिक फरक लक्षात घ्यायला हवा: गणपतीची उपासना किती जुनी? आणि आज आपण ज्या स्वरूपात गणपतीची पूजा करतो ते स्वरूप किती जुने? हे दोन वेगळे प्रश्न आहेत. राजवाड्यांचा पुराव्यांचा आधार पहिल्या प्रश्नासाठी आहे. आजची गणेशचतुर्थी, सार्वजनिक गणेशोत्सव, गणपतीची विशिष्ट मूर्तिपूजा ही नंतरच्या ऐतिहासिक प्रक्रियेत विकसित झालेली रूपे आहेत. म्हणून गणपतीचा नेमका जन्मकाळ अमुक इ.स.पूर्व वर्षी झाला असा राजवाड्यांचा दावा नव्हता. ते उपलब्ध वाङ्मयीन पुराव्यांवरून गणपती-उपासनेचे प्राचीनत्व निश्चित करण्याचा प्रयत्न करत होते. आणखी एक रोचक मुद्दा म्हणजे डॉ. आर. जी. भांडारकर यांचे मत राजवाड्यांपेक्षा वेगळे होते-भांडारकरांच्या मते गणेशोपासना साधारण इ.स.च्या ५व्या शतकापासून लोकप्रिय झाली, तर राजवाडे तिचे मूळ त्यापेक्षा सुमारे हजार वर्षे मागे नेत होते.

**भारताबाहेर गणेश उपासना**

भारताबाहेर अनेक देशांमध्ये भगवान गणेशाच्या प्राचीन आणि भव्य मूर्ती सापडतात. आशियाई देशांमध्ये सनातन धर्माच्या आणि बौद्ध धर्माच्या प्रसारामुळे गणपती बाप्पाची पूजा वेगवेगळ्या रूपात केली जाते. भारताबाहेर ज्या मुख्य देशांमध्ये गणेशाच्या मूर्ती आणि मंदिरे आढळतात, त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे: इंडोनेशिया हा मुस्लीम बहुल देश असला, तरी तिथे गणपतीला खूप मोठे स्थान आहे. ज्वालामुखीच्या काठावरील गणपती: पूर्व जावामधील माउंट ब्रोमो (चींपीं ड्डी)या जिवंत ज्वालामुखीच्या अगदी काठावर गणपतीची एक प्राचीन मूर्ती आहे. स्थानिक लोक ज्वालामुखीचा कोप होऊ नये म्हणून आजही या बाप्पाची पूजा करतात. प्रमबाणन मंदिर येथील ९ व्या शतकातील प्रसिद्ध शिवमंदिरात गणेशाची भव्य मूर्ती आहे. इंडोनेशियन चलन: इंडोनेशियाच्या २०,००० रुपयाच्या नोटेवर देखील भगवान गणेशाचा फोटो छापलेला होता , तो २००८ साली काढला गेला

**✻थायलंड✻**

थायलंडमध्ये गणपतीला 'फ्रा फिकानेत' (Phra Phikanet) म्हटले जाते. इथे कला आणि यशाची देवता म्हणून त्यांची मोठी श्रद्धा आहे. चाचोएंगसाओ (Chachoengsao)या



शहराला थायलंडचे 'गणेश शहर' म्हणतात. इथे गणपतीच्या तीन महाकाय मूर्ती आहेत, ज्यामध्ये सुमारे १५० फूट उंच बसलेली मूर्ती आणि ३९ मीटर उंच उभी असलेली मूर्ती (घहश्रेपस घर्हीशरप) जगप्रसिद्ध आहे.

**✻जपान✻**

जपानमध्ये गणपतीला 'कांगितेन कवा शोटेन या नावाने ओळखले जाते. ✻ टोक्योमधील प्रसिद्ध मात्सुचियामा शोदेन (चर्रीीलहळूरार ड्ढेवशप) मंदिरासह संपूर्ण जपानमध्ये गणपतीची सुमारे २५० मंदिरे आहेत. येथे गणपतीचे रूप थोडे वेगळे (एकमेकांना मिठी मारलेल्या जोडप्याच्या रूपात) असते. **✻कंबोडिया✻** ✻ जगप्रसिद्ध अंगकोर वाट (-पसञ्ञी थर्री)मंदिर परिसराच्या उत्खननात ५ व्या शतकापासूनच्या प्राचीन गणेश मूर्ती सापडल्या आहेत. इथे गणेशाला 'प्रह केनेश' म्हटले जाते. **✻अफगाणिस्तान✻**

✻ **अफगाणिस्तानमधील काबूलजवळील गार्डेझ**

या ठिकाणी 'गार्डेझ गणेश' नावाने ओळखली जाणारी एक प्रसिद्ध प्राचीन मूर्ती सापडली होती. ही मूर्ती ५ व्या ते ६ व्या शतकातील असल्याचे मानले जाते.

म्यानमार / बर्मा (चूरपारी) येथील प्राचीन श्वेसांडॉ पॅगोडा च्या कोपऱ्यांवर गणपतीच्या मूर्ती बसवलेल्या आहेत. यामुळे स्थानिक लोक याला 'गणेश पॅगोडा' म्हणूनही ओळखतात.

**✻चीन✻**

उत्तर चीनमध्ये झालेल्या उत्खननात इ.स. ५३१ मधील गणपतीची एक अत्यंत प्राचीन दगडी मूर्ती सापडली आहे, जी सध्या तिथल्या संग्रहालयात जतन केलेली आहे. याशिवाय नेपाळ, श्रीलंका, मॉरिशस, मलेशिया, अमेरिका आणि लंडनच्या संग्रहालयांमध्येही भारताबाहेरील अनेक प्राचीन गणेश मूर्ती पाहायला मिळतात.

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा।।
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा।
गमूं पंथ आनंत या राघवाचा

**समर्थ रामदास**

**संकलन**

**डॉ.नीलकंठ दत्तात्रय देशपांडे**
9811045258
**व्हॅट्‌अप साभार**

# 'ज्ञानाची पालखी'; बाप्पाच्या चरणी 'विद्या दानाचा' देखावा!




मुंबई : गणेशोत्सव म्हणजे केवळ भव्य देखावे आणि आरास नव्हे, तर 'श्रद्धेतून संस्कृती आणि संस्कृतीतून सेवा' हाच खरा विचार आहे, हे अँटॉप हिल येथील 'मुंबईचा इच्छापूर्ती गणपती मंडळाने' पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. कोकणच्या मातीत रुजलेली आणि संस्कृतीचा वारसा जपणारी शिमगोत्सवाची पालखी यंदा इच्छापूर्ती मंडळाच्या रूपाने मुंबईत अवतरली आहे. मात्र, ही केवळ परंपरेची पालखी नसून, ग्रामीण भागातील चिमुकल्यांचे भविष्य उजळवणारी 'देवरूपी ज्ञानाची पालखी' ठरली आहे. 'एक साडी, एक सन्मान' नंतर आता 'विद्या दानाचा' ध्यास

लालबागच्या राजाचा प्रसाद आता 'इको-फ्रेंडली' ताटात; प्लास्टिकला फाटा देत १,५८० किलो कार्बन उत्सर्जन रोखले

मुंबई : 'लालबागच्या राजा'च्या चरणी लीन होणाऱ्या लाखो भाविकांसाठी यंदा एक अत्यंत स्तुत्य आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात येत आहे.

सामाजिक बांधिलकी जपणारे मंडळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इच्छापूर्ती मंडळाने गेल्या वर्षी एक साडी, एक सन्मान या उपक्रमाद्वारे ८०० हून अधिक गरजू महिलांना सन्मानित केले होते. याच सेवाभावाची पुढची पायरी म्हणून यंदा मंडळाने ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके, शैक्षणिक साहित्य आणि उज्ज्वल भविष्याची आशा देण्याचा दृढ संकल्प केला आहे. मंडळाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने आपला वेळ, मेहनत, कला आणि कल्पकता पणाला लावून ही अनोखी संकल्पना साकारली आहे. आमच्यासाठी सजावट म्हणजे केवळ डोळ्यांचे पारणे फेडणारा देखावा नाही, तर कलेतून संस्कृती जपायची, संस्कृतीतून सेवा करायची आणि याच सेवेतून देशाचे भविष्य घडवायचे हा आमचा ध्यास आहे, अशी भावना मंडळाच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

बाप्पाच्या आराधनेची नवी व्याख्या

श्रींचे पूजन केवळ फुले आणि नैवेद्य अर्पण करूनच नाही, तर एखाद्या गरजू आणि होतकरू मुलाच्या हातात पुस्तक टेकवूनही करता येते, हा सुंदर संदेश या माध्यमातून देण्यात आला आहे. कोकणी संस्कृतीची ओळख, परंपरेचा आदर आणि त्याला जोडलेली शिक्षणाची कास यामुळे अँटॉप हिलच्या इच्छापूर्ती मंडळाची ही 'ज्ञानाची पालखी' सध्या संपूर्ण मुंबईकरांच्या कौतुकाचा आणि आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

# पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त लावले राणीबागेत 'सेंच्युरी पाम'

मुंबई (विशेष प्रतिनिधी) : केंद्र सरकारच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'एक पेड माँ के नाम' अभियान अंतर्गत आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यानात (राणीबाग)महानगरपालिका आयुक्त आश्विनी भिडे यांच्या हस्ते 'सेंच्युरी पाम' या वृक्षाची लागवड केली. सेंच्युरी पाम या वृक्षाची लागवड करून महापालिका आयुक्तांनी देशाच्या पंतप्रधानांना अनोख्या पद्धतीने शुभेच्छा देत त्यांचा वाढदिवस साजरा केला. भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालय येथे महानगरपालिका आयुक्त आश्विनी भिडे यांनी आज भेट देऊन येथील विविध प्रकल्प आणि उपक्रमांची पाहणी केली. या उद्यानातील 'जास्वंद प्रदर्शन'चेही भिडे यांनी यावेळी अवलोकन केले. या प्रदर्शनात जास्वंद वनस्पतीच्या विविध रंगांच्या सुमारे ५० प्रजाती उपलब्ध आहेत. हे प्रदर्शन जनतेसाठी खुले असून त्यांनी याबाबत समाधान व्यक्त केले. तसेच, केंद्र सरकारच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'एक पेड माँ के नाम' अभियान अंतर्गत आणि माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त उद्यानात 'सेंच्युरी पाम' या वृक्षाची त्यांनी लागवड केली. वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालय परिसरात उभारण्यात येत असलेल्या 'बोगद्यातील मत्स्यालय'च्या बांधकामाची त्यांनी पाहणी करत जानेवारी २०२७ पर्यंत सादर बांधकाम पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.


# मायानगरी स्वच्छ मुंबईचे खरे शिल्पकार

मुंबई : मायानगरी मुंबईला स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी दिवस-रात्र अथक परिश्रम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या अमूल्य योगदानाला सलाम करणारा एक अत्यंत भावुक आणि प्रबोधनात्मक देखावा यंदा 'पंचगंगा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळा'ने सादर केला आहे. 'स्वच्छ मुंबईचे शिल्पकार' या संकल्पनेतून साकारलेला हा देखावा केवळ भक्तीचा नव्हे, तर स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सफाई कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा एक सशक्त सामाजिक संदेश देत आहे. या अप्रतिम देखाव्याची मूळ संकल्पना आणि कलादिग्दर्शन डॉ. सुमित पाटील यांनी केले आहे. 'ज्यांच्या हातांनी मुंबई स्वच्छ होते, त्या हातांना सलाम!'

सफाई कर्मचारी हे केवळ कचरा गोळा करणारे कामगार नसून, ते खऱ्या अर्थाने या शहराचे आरोग्य राखणारे 'शिल्पकार' आहेत, हा विचार या देखाव्यातून अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. आपल्या सर्वांच्या घरातून आणि रस्त्यांवरून निर्माण होणारा कचरा उचलून शहर चकाचक ठेवणाऱ्या या घटकाच्या मेहनतीकडे अनेकदा समाजाचे दुर्लक्ष होते. त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील आव्हाने, अहोरात्र चालणारी मेहनत आणि समाजासाठीचे त्यांचे योगदान कलात्मक मांडणीतून येथे जिवंत करण्यात आले आहे.

सफाई कर्मचाऱ्यांसाठी 'कलाकार कट्टा' :

सफाई कर्मचाऱ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी देखाव्यात 'कलाकार कट्टा' ही विशेष संकल्पना साकारली आहे. गायन, वादन, चित्रकला, शिल्पकला आणि पाककला



यांसारख्या कलांना प्रोत्साहन देऊन त्यांच्यातील कलाकाराचा गौरव करण्याचा हा एक अनोखा प्रयत्न आहे. पर्यावरण संवर्धन आणि 'टाकाऊपासून टिकाऊ' गणेशोत्सवात निर्माण होणाऱ्या कचऱ्याबाबत जनजागृती करताना मी तुमच्या शहराची कचऱ्याची गाडी बोलते आहे या संकल्पनेतून नागरिकांशी थेट संवाद साधला आहे. ओला व सुका कचरा वेगळा करणे, निर्माल्याची योग्य विल्हेवाट लावणे, तसेच प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण सजावटीसाठी प्लास्टिक बाटल्या, स्क्रॅप मेटल, ई-वेस्ट, कागद आणि लाकडासारख्या टाकाऊ साहित्याचा पुनर्वापर करण्यात आला आहे. भक्ती आणि सामाजिक जाणिवेचा सुंदर संगम!

पंचगंगा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा हा उपक्रम केवळ धार्मिक उत्सवापुरता मर्यादित न राहता, समाजातील प्रत्येक घटकाला पर्यावरणाविषयी आणि सफाई कर्मचाऱ्यांविषयी संवेदनशील बनवणारा ठरत आहे. या अद्वितीय आणि प्रेरणादायी देखाव्याला प्रत्यक्ष भेट देऊन सफाई कर्मचाऱ्यांच्या योगदानाला वंदना करण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी तासन्तास रांग; भाविकांना धक्काबुक्कीचा तखऑज व्हायरल!

मुंबई : लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी मुंबईत गणेशभक्तांची मोठी गर्दी उसळली आहे. अनेक भाविक तासन्तास रांगेत उभे राहून आपल्या लाडक्या बाप्पाच्या दर्शनाची प्रतीक्षा करत आहेत. मात्र, दर्शनाच्या ठिकाणी गर्दी नियंत्रणादरम्यान भाविकांना धक्काबुक्की होत असल्याचे दृश्य समोर आले आहे. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे.

तासन्तास रांगेनंतर नेमकं काय घडलं?

लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले आहेत. गर्दी वाढल्याने दर्शनाच्या मार्गावर मोठी कोंडी निर्माण होत आहे. याचदरम्यान समोर आलेल्या व्हिडीओमध्ये पोलिस कर्मचारी गर्दीत



अडकलेल्या भाविकांना पुढे जाण्यासाठी ढकलताना दिसत आहेत. काही भाविकांना अक्षरशः हाताने बाजूला करत बाहेरच्या दिशेने हलवले जात असल्याचे दृश्य व्हिडीओत कैद झाले आहे.

भाविकांमध्ये नाराजी


दूरवरून लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी आलेले भाविक अनेक तास रांगेत उभे राहत आहेत. मोठ्या प्रतीक्षेनंतर दर्शनासाठी समोर आल्यानंतरही गर्दी नियंत्रणाच्या नावाखाली धक्काबुक्की होत असल्याचा आरोप काही भाविकांकडून केला जात आहे. त्यामुळे दर्शन व्यवस्थेबाबत भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. व्हिडीओत काय दिसतं? लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी मोठी गर्दी गर्दीत पोलिसांचा मोठा बंदोबस्त भाविकांना पुढे जाण्यासाठी पोलिसांकडून ढकलले जात असल्याचे दृश्य काही भाविकांना हाताने बाजूला करताना पोलीस दिसत आहेत

तासन्तास रांगेनंतर अशा प्रकारे वागणूक मिळाल्याने भाविकांमध्ये नाराजी सोशल मीडियावर व्हिडीओची चर्चा गर्दी नियंत्रण की भाविकांची गैरसोय? लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक मुंबईत येतात. त्यामुळे गर्दीचे नियोजन आणि सुरक्षितता राखणे हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान असते. मात्र, गर्दी नियंत्रण करताना भाविकांना धक्काबुक्की होऊ नये आणि त्यांना सन्मानपूर्वक दर्शन घेता यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, व्हिडीओतील दृश्यांच्या पार्श्वभूमीवर संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांची नेमकी भूमिका आणि त्या वेळी निर्माण झालेली परिस्थिती याबाबत अधिकृत स्पष्टीकरण अद्याप समोर आलेले नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# अग्रवाल सेवा समिती अध्यक्षपदी अमोल अग्रवाल; सचिवपदी अमर बगडीया
## समाजाच्या वतीने नवीन कार्यकारिणीची घोषणा; युवकांना मिळणार सक्रिय सहभाग

परतूर (प्रतिनिधी) : अग्रवाल समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व सेवाभावी उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याच्या उद्देशाने अग्रवाल सेवा समिती, परतूरची नवीन कार्यकारिणी समस्त अग्रवाल समाजाच्या वतीने जाहीर करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी अमोल शांतीलालजी अग्रवाल, तर सचिवपदी अमर मुरलीधरजी बगडीया यांची निवड करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी गणेश शंकरलालजी अग्रवाल व धीरज सजनलालजी केजडिवाल, कार्याध्यक्षपदी युधिष्टिर लक्ष्मणलालजी अग्रवाल, कोषाध्यक्षपदी सौरभ सावरमलजी बगडीया, सहकोषाध्यक्षपदी शरद शिवकुमारजी भारूका, तर सहसचिवपदी रोहित गणेशलालजी अग्रवाल यांची निवड करण्यात आली. तसेच समस्त अग्रवाल युवावर्गाचा कार्यकारिणी सदस्य म्हणून सहभाग राहणार आहे. अग्रवाल सेवा समितीच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे, सामाजिक एकोपा वृद्धिंगत करणे, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच गरजूंसाठी सेवाभावी उपक्रम राबविण्यावर भर दिला जाणार आहे. नवनियुक्त अध्यक्ष अमोल अग्रवाल व सचिव अमर बगडीया यांच्यासह संपूर्ण कार्यकारिणीचे अग्रवाल समाजातील ज्येष्ठ नागरिक, युवक व समाजबांधवांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून समाजहिताचे विविध उपक्रम अधिक जोमाने राबविले जातील, अशी अपेक्षा समाजबांधवांनी व्यक्त केली.




अध्यक्ष अमोल शांतीलाल अग्रवाल, सचिव अमर मुरलीधर बगडीया, उपाध्यक्ष गणेश शंकरलाल अग्रवाल, धीरज सजनलाल केजडिवाल, कार्याध्यक्ष युधिष्टिर लक्ष्मणलाल अग्रवाल, कोषाध्यक्ष सौरभ सावरमल बगडीया, सहकोषाध्यक्ष शरद शिवकुमार भारूका, सहसचिव रोहित गणेशलाल अग्रवाल, सदस्य समस्त अग्रवाल युवावर्ग आदीची निवड करण्यात आली.

# शांतिनिकेतन मध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा !

जालना, प्रतिनिधी : शहरातील संभाजीनगर प्रभागातील शांतीनिकेतन विद्यामंदिर या शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी ध्वजारोहण निरामय हॉस्पिटलचे संचालक डॉ. पद्माकरजी सबनीस यांच्या हस्ते व नगरसेवक अजित मानधनी, श्री.प्रवीण मोहता, श्री.पांडुरंग काळे, किशोर अनभोरे, प्राथमिकचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका प्रेमला पंडित, नर्सिंगचे प्राचार्य विजय राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे यांचे सादरीकरण केले. तसेच यावेळी विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. डॉ. पद्माकर सबनीस यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. तर शिक्षक सुर्यकांत बेले यांनीही विद्यार्थ्यांना मुक्तीसंग्राम दिनाच्या औचित्याने माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन नियोजन शिक्षक शिवहरी मांटे यांनी तर सूत्रसंचलन शिक्षक अंबादास घायाळ यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक अशोक माधवले, मोहन भदाडे, संजय खरात, सुनिता खरात,




अमोल पवार, गजानन दळवी, शिवराम गिराम, सुनील जाधव, पुरुषोत्तम चौरे, कीर्ती खैरे, अनिता जाधव, रमेश गाढवे, सीमा इंगळे, रामकिसन मोहिते, स्वाती काकडे, विद्या चौधरी, कांचन वाघ, अरुणा मांटे, उद्धव वाघ, गायत्री सूर्यवंशी, किशोर शेळके, संदीप वाखारकर, सुमित्रा शर्मा, धनंजय सोनवणे, लक्ष्मी वटाणे, पूनम गायकवाड, विशाल वाघ, कौशल्या घायाळ, वसंत गाडेकर, तुकाराम चव्हाण, अनिता पिछाडे, गीता किंगरे यांनी प्रयत्न केले. यावेळी मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# सेवा संकल्पातून लोकाभिमुख प्रशासन
## महिनाभराचा उपक्रम ; प्रशासन जनतेच्या दारी




'सेवा परमो धर्मः' ही केवळ एक उक्ती नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना आहे. शासनाच्या योजना तयार होतात, निर्णय घेतले जातात; मात्र त्यांचा खरा अर्थ तेव्हा अधोरेखित होतो, जेव्हा त्या योजनांचा लाभ गावातील सामान्य कुटुंबापर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत, महिलांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचतो. प्रशासन १७ सप्टेंबरपासून अशाच एका लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सज्ञ झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, त्यांच्या कार्यकाळात 'सेवा परमो धर्मः' या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.हे अभियान म्हणजे केवळ कार्यक्रमांची मालिका नाही. सरकारी सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ नेण्याचा हा प्रयत्न आहे.

**कार्यालयाच्या फेऱ्या कमी होणार**

गावातील एखाद्या नागरिकाला प्रमाणपत्र हवे असते, शेतकऱ्याला जमिनीची नोंद अद्ययावत करायची असते किंवा एखाद्या कुटुंबाला सरकारी योजनेचा लाभ घ्यायचा असतो. अशा वेळी अनेकदा विविध कार्यालयांमध्ये जावे लागते. सेवा संकल्प अभियानात ही प्रक्रिया शक्य तितकी सोपी करण्यावर भर देण्यात आला आहे.

प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू' शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. म्हणजेच अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.

**शिबिरांच्या माध्यमातून कामांना गती**

या शिबिरांमध्ये फेरफार नोंदींचा निपटारा, स्वामित्व सनद, शेतपाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, वनहक्क दावे, नळजोडणी, वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ आणि ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सोप्या भाषेत सांगायचे तर-ज्या सेवेसाठी नागरिकाला वारंवार कार्यालयात जावे लागते, ती सेवा शक्य तितकी त्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न या अभियानातून होणार आहे.

**गावात सेवा, गावातच समाधान**

सेवा संकल्प अभियानाचा विशेष भर ग्रामीण भागावरही आहे. प्रत्येक गावात आणि वॉर्डात स्थानिक गरजेनुसार 'सेवा माझे योगदान' उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना यात सहभागी करून घेतले जाणार आहे.

गाव स्वच्छ ठेवणे, नदीघाट आणि बारवांची स्वच्छता करणे, वृक्षारोपण करणे, रक्तदान करणे, आरोग्य तपासणी शिबिर घेणे, प्लास्टिकमुक्तीची जनजागृती करणे, जलसंधारण करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, रस्ते सुरक्षेबाबत जागृती करणे अशा अनेक उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळणार आहे.

**शासनाची सेवा, समाजाचा सहभाग**

याचा अर्थ एकच-शासनाची सेवा आणि समाजाचा सहभाग एकत्र आला, तर गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो.ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जमीन आणि महसूल विषयक कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. फेरफार नोंदी, ७/१२, ८-अ, स्वामित्व सनद, वनहक्क दावे यांसारख्या बाबी अनेकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या आहेत.

वनहक्क दाव्यांच्या बाबतीत नवीन दावे स्वीकारणे, जुन्या दाव्यांमधील दुरुस्ती करणे आणि पात्र दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अभियानाच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.म्हणूनच सेवा संकल्प अभियानाचा लाभ गावातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन गरजांशी जोडून पाहणे महत्त्वाचे आहे.

**अंगणवाडीतही सेवा उत्सव**

लहान मुले आणि त्यांच्या मातांसाठीही या अभियानांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'अंगणवाडी उत्सव' अंतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य आणि पोषणविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, फळे व मिठाईचे वाटप आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची तरतूद आहे. ग्रामीण कुटुंबाच्या आरोग्याचा पाया मजबूत करण्यासाठी आई आणि बालकाचे आरोग्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे अंगणवाडी उत्सव हा केवळ एक कार्यक्रम न राहता आई, बालक आणि पोषण यांना जोडणारा उपक्रम ठरतो.

**गावातील तरुणांच्या कल्पनांना नवे व्यासपीठ**

आज ग्रामीण भागातील तरुणांकडे अनेक चांगल्या कल्पना आहेत. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत ते नवे प्रयोग करू शकतात. योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर या कल्पना मोठ्या बदलाचे कारण ठरू शकतात.सेवा संकल्प अभियानात राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागात नवे प्रभावी उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यासाठी 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खासगी कंपन्यांचाही सहभाग घेतला जाणार आहे. निवडलेल्या उत्कृष्ट कल्पनांना तज्ज्ञांसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा**

देशाचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या अभियानाशी जोडण्यात आले आहे. 'विकसित भारत' आणि 'मुलांच्या स्वप्नातील भारत' या विषयांवर चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना व्यासपीठ देण्याचा हा प्रयत्न आहे.आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. त्यामुळे विकसित भारताची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यासोबतच त्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना भविष्यातील भारताच्या उभारणीशी जोडण्याचा हा प्रयत्न आहे.

**लाभार्थ्यांच्या घरापर्यंत 'आशीर्वादाचा दिवा**

शासकीय योजनेचा लाभ मिळालेल्या नागरिकाच्या घरापर्यंत जाऊन 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्याचा उपक्रमही या अभियानात आहे. विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन दीप प्रज्वलित करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.सरकारची योजना कागदावर असते; पण तिचा लाभ जेव्हा एखाद्या कुटुंबाच्या घरात पोहोचतो, तेव्हा त्या योजनेला खरा अर्थ प्राप्त होतो. त्या समाधानाच्या क्षणाला जोडणारा हा उपक्रम आहे.

**बदलाची गोष्ट आता गावागावातून**

एखाद्या शेतकऱ्याला योजनेचा लाभ मिळाल्याने शेतीत बदल झाला, एखाद्या महिलेला बचत गटामुळे आर्थिक आधार मिळाला, एखाद्या विद्यार्थ्याला संधी मिळाली किंवा एखाद्या कुटुंबाचे जीवनमान सुधारले, तर ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट राहत नाही. ती इतरांसाठीही प्रेरणा बनते.

म्हणूनच 'बदलाची गोष्ट' या उपक्रमातून विविध योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल त्यांच्या स्वतःच्या शब्दांत समाजासमोर आणला जाणार आहे. त्यांच्या अनुभवांचे व्हिडिओ आणि रील्सच्या माध्यमातून संकलन करण्यात येणार आहे.

**सेवा संकल्पाची खरी दिशा**

सेवा संकल्प अभियानातील प्रत्येक उपक्रमामागे वेगवेगळी उद्दिष्टे असली, तरी त्यामागची भावना एकच आहे-सामान्य नागरिकाला सेवा मिळविण्यासाठी अधिक सोपे, सुलभ आणि जवळचे वातावरण निर्माण करणे.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद व लोकसहभाग वाढविणारा ठरणार आहे. योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना मिळावा, शासन अधिक लोकाभिमुख व्हावे आणि शासनाच्या योजना सामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. 'माहितीअभावी पात्र व्यक्ती वंचित राहता कामा नये', ही या उपक्रमामागील प्रमुख भूमिका आहे. या अभियानाला नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद त्याच्या यशासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

पान १ वरून...

## मराठवाडा मुक्तीसंग्रामात

उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सुरू केलेल्या 'जालना मित्र' पोर्टलच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात २ हजार ४६२ नागरिकांना घरपोच प्रमाणपत्रे वितरित करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली.

प्रारंभी मान्यवरांनी टाऊन हॉल परिसरात लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर हुतात्मा स्मारक स्मृती स्तंभास पुष्पचक्र वाहून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. तर पोलिस जवानांनी हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून व पोलिस बँड पथकाने शोकधून वाजवून हुतात्म्यांना मानवंदना दिली. यावेळी स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, विद्यार्थी, नागरिक यांची उपस्थिती होती.

## जालना महापालिका बरखास्त करा

साधून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यावर भर देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. काँग्रेसच्या विचारधारेवर विश्वास असलेल्या कार्यकर्त्यांना सक्रिय करून युवक, महिला, विद्यार्थी, कामगार तसेच विविध समाजघटकांपर्यंत पक्षाचा जनसंपर्क वाढविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. 'पदाधिकारी केवळ पदावर राहण्यासाठी नसून जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून काम करणारे असावेत. जालना शहरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी काँग्रेस कार्यकर्ते सातत्याने संघर्ष करतील,' असे डॉ. धानुरे यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमास ग्रामीण जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटी जालना कल्याणराव दळे, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, प्रदेश उपाध्यक्ष अल्पसंख्याक काँग्रेस कमिटी बदर चाऊस, माजी आमदार राजेश राठोड, माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, ज्येष्ठ नेते संजय मुथा, सुनील चौधरी, राजेंद्र गोरे, अशोक उबाळे, ज्ञानेश्वर भादरंगे, चैतन्य जायभाये, नंदा मित्तल, करिम बिल्डर, सागर चौधरी, योगेश कदम, विनोद पांडव, रघुवीर गुडे, इब्राहिम शेख, वसीम शेख, चंद्रकांत रत्नपारखे, वसीम खान, बाबासाहेब सोनवणे, दिनेश सुराणा, आरेफ शेख, देविराज डोंगरे आदी उपस्थित होते. शहर काँग्रेसचे आजी-माजी पदाधिकारी, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, एनएसयूआय, सेवादल तसेच विविध सेलचे पदाधिकारी आणि काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रघुवीर गुडे यांनी केले, तर आभार आदित्य चंदनकर यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांच्या वतीने करण्यात आले.

## स्मारक अस्वच्छ, निवेदन

भारतीय विद्यार्थी परिषद, जालना शाखेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी जिल्हा संयोजक गणेश बोंडे, सहसंयोजक अजित उबाळे, उमेश भोसले, प्रणील देशपांडे यांच्यासह अभाविपचे इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## मराठवाडा मुक्ती संग्राम

स्थानिक स्वातंत्र्यवीरांच्या योगदानावर प्रकाश टाकला. विशेषतः रणरागिणी दगडाबाई शेळके यांच्या धाडसी कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. दगडाबाई शेळके यांनी गावोगावी बैठका घेत जनजागृती केली. पुरुषांच्या वेशात घोड्यावर स्वार होऊन निजामाच्या राजवटीविरोधातील संदेश पोहोचविण्याचे धाडसी कार्य केले. तसेच निजामाच्या छावण्यांविरोधात कारवायांमध्ये सहभाग घेत स्वातंत्र्यलढ्याला बळ दिले, असे त्यांनी सांगितले. आजच्या पिढीने स्वातंत्र्य सहज मिळाले असे समजू नये. त्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपले जीवन पणाला लावले. त्यांच्या त्यागाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे आणि त्यांच्यात राष्ट्रभक्तीची भावना निर्माण करणे ही आपली जबाबदारी आहे, असे व्यवस्थापक नवनाथ गव्हाणे यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष भगवानराव मात्रे, प्रमुख पाहुणे मदनराव पाटील (जीजा), डॉ. रामेश्वर पाटील, सुरज जी. पवार, सिद्धेश शेळके, व्यवस्थापक नवनाथ गव्हाणे, मुख्याध्यापिका अश्विनी डिघे, शिक्षिका स्वाती पवार, अपर्णा काळे, निशा वाकडे तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मानवी रांगोळीद्वारे

राष्ट्रीय प्रतिके आणि विकसित भारताची संकल्पना या विषयावर आधारीत मानवी रांगोळीचा उपक्रम राबविला. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातुन १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जालना जिल्ह्यात जिल्हा व प्रत्येक तालुकास्तरावर 'सेवा सेतू शिबिरे' आयोजित करण्यात येणार आहे. याद्वारे नागरिकांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देणे, कार्यालयांमधील प्रलंबित कामांचा गतीने निपटारा करणे, 'नाविन्यपूर्ण संकल्पना' मांडण्यासाठी इनोव्हेशन चॅलेंज, 'सेवा माझे योगदान', स्वच्छता मोहीम आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यावेळी कार्यक्रमास कार्यकारी अभियंता जंजाळ, शिक्षणाधिकारी संगीता भागवत, उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे, गटविकास अधिकारी ऋषिकेश टेकाळे, सहायक गटविकास अधिकारी गजानन पाखरे, संपर्क अधिकारी भगवान तायड यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## सोमवारपासून जालना

खोतकर यांनी सांगितले. या मार्गावर सिटी बस सेवा धावणार आहे.सिटी बस सुरु झाल्यामुळे शहरातील विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कामगार तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या सिटी बस सेवेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केलेल्या पाठपुराव्याचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे. या बैठकीला शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांचीही उपस्थिती होती.

## जिल्हा परिषदेत मानवी

संकल्पना या विषयावर आधारीत मानवी रांगोळीचा उपक्रम राबविला. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातुन १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जालना जिल्ह्यात जिल्हा व प्रत्येक तालुकास्तरावर 'सेवा सेतू शिबिरे' आयोजित करण्यात येणार आहे. याद्वारे नागरिकांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देणे, कार्यालयांमधील प्रलंबित कामांचा गतीने निपटारा करणे, 'नाविन्यपूर्ण संकल्पना' मांडण्यासाठी इनोव्हेशन चॅलेंज, 'सेवा माझे योगदान', स्वच्छता मोहीम आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यावेळी कार्यक्रमास कार्यकारी अभियंता जंजाळ, शिक्षणाधिकारी संगीता भागवत, उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे, गटविकास अधिकारी ऋषिकेश टेकाळे, सहायक गटविकास अधिकारी गजानन पाखरे, संपर्क अधिकारी भगवान तायड यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

पान ४ वरून...

## जालना जिल्ह्यातील

होणाऱ्या सल्लूयाचा अवलंब करावा. जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासन आवश्यक त्या उपाययोजना करीत असून, शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्ती यांनी सांगितले आहे.

## राष्ट्रीय कुष्ठरोग

संशयित कुष्ठरुग्णांची तातडीने तपासणी व उपचार सर्वेक्षणादरम्यान त्वचेवरील बधीर चट्टे बाधित मज्ञा, हात पायांच्या संवेदनांमध्ये घट आदी कुष्ठरोगाची लक्षणे असलेल्या संशयित व्यक्तींची पुढील तपासणी करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार संबंधित आरोग्य संस्थेकडे संदर्भित करून निदान व उपचाराची कार्यवाही केली जाणार आहे. तसेच पात्र सहवासितांना प्रतिबंधक औषधोपचार देण्यात आले आहे किंवा नाही. याची तपासणी केली जाणार असून, पात्र व्यक्तींना नियमानुसार प्रतिबंधक उपचार झएझ देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. आरोग्य विभागाच्या पथकांमार्फत अंमलबजावणी

या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची राहणार आहे. राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका तसेच आवश्यकतेनुसार इतर क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेण्यात येणार आहे, हा उपक्रम नियमित आरोग्य विभागीय कार्याचा भाग म्हणून राबविण्यात येणार आहे.

सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर तपासलेल्या घरांची व व्यक्तींची संख्या संशयित व निदान झालेले नवीन रुग्ण, बाल कुष्ठरुग्ण, सांसर्गिक कुष्ठरुग्ण, विकृती असलेले रुग्ण तसेच झएझ प्रतिबंधक औषधोपचार देण्यात आलेल्या सहवासितांची संख्या यांचा समावेश असलेला अहवाल तयार करण्यात येणार आहे. कुष्ठरोगाची लक्षणे आढळल्यास विलंब न करता जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेशी संपर्क साधावा, लवकर निदान आणि योग्य उपचारामुळे कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यास तसेच विकृती टाळण्यास मदत होते.

## कायदा-सुव्यवस्था

सुरू असलेल्या कारवायांमुळे अवैध प्रवृत्तींना मोठा आळा बसला असल्याचे प्रशासनाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. वाहनधारकांनी क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक करू नये. वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र, परवाना व रिफ्लेक्टर अद्ययावत ठेवावेत. अवैध दारू, जुगार किंवा गौण खनिजांची अवैध वाहतूक अथवा उत्खनन निदर्शनास आल्यास नागरिकांनी तातडीने प्रशासनाला माहिती द्यावी. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे आणि शांतता भंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई यापुढेही सुरू राहील, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

## जालना मनपा प्रशासनाचा

पूर्णपणे चौक (रुकून) झाले आहेत. त्यामुळे नाल्यांमधील तुंबलेले घाण पाणी थेट मुख्य रस्त्यावर साचले आहे. याच पाण्यातून लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना ये-जा करावी लागत असून परिसरात दुर्गंधी पसरली आहे. यामुळे साथीचे आजार पसरण्याची भीती व्यक्त होत आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी व सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र शेटे यांनी महानगरपालिकेचे अधिकारी तसेच स्वच्छता निरीक्षकांना वारंवार सूचना व तक्रारी दिल्या. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. मनपा प्रशासनाने या समस्येची तत्काळ दखल घेऊन चेंबरची दुरुस्ती करावी आणि नागरिकांना दिलासा द्यावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र शेटे यांनी केले आहे.

# गणेशोत्सवात सोन्या-चांदीच्या दरात मोठी उलथापालथ, एका दिवसात 'इतकी' घसरण

गणेशोत्सवाच्या काळात जळगावच्या सुवर्ण बाजारपेठेत सोन्या-चांदीच्या दरात मोठी चढ-उतार पाहायला मिळत आहे. सलग दोन दिवस दरवाढ झाल्यानंतर गुरुवारी सकाळी दोन्ही मौल्यवान धातूंच्या दरात अचानक घसरण झाली. त्यामुळे सोने-चांदी खरेदीचा विचार करणाऱ्या ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. सोन्याच्या दरात जवळपास २ हजारांची घट जळगावच्या सुवर्ण बाजारपेठेत बुधवारी दिवसभरात २४ कॅरेट सोन्याच्या दरात १,५४५ रुपयांची वाढ झाली होती. त्यामुळे तीन टक्के जीएसटीसह सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम १,५७,२८१ रुपयांवर पोहोचला होता. मात्र, गुरुवारी सकाळी बाजार सुरू होताच सोन्याच्या दरात १,७५१ रुपयांची घट नोंदवण्यात आली. त्यामुळे तीन टक्के जीएसटीसह २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम १,५५,५३० रुपयांवर आला. चांदीही स्वस्त; ३ हजारांची



घसरण चांदीच्या दरातही बुधवारी मोठी वाढ झाली होती. दिवसभरात चांदीच्या दरात ३,०९० रुपयांची वाढ झाल्याने तीन टक्के जीएसटीसह चांदीचा दर प्रति किलो २,४१,०२० रुपयांपर्यंत पोहोचला होता. मात्र, गुरुवारी सकाळच्या व्यवहारात चांदीच्या दरात पुन्हा ३,०९० रुपयांची घट झाली. त्यामुळे जीएसटीसह चांदीचा दर प्रति किलो २,३७,९३० रुपयांवर आला. अमेरिकेतील फेडच्या निर्णयाचा परिणाम जागतिक बाजारातील हालचालींचाही भारतीय बुलियन बाजारावर परिणाम होत आहे. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या व्याजदरविषयक निर्णयानंतर डॉलर आणि अमेरिकी रोख्यांच्या उत्पन्नात झालेल्या हालचालींमुळे सोने-चांदीच्या दरात अस्थिरता वाढली आहे. १५-१६ सप्टेंबर रोजी झालेल्या ऋजचउ बैठकीनंतर फेडरल फंड्सचा लक्ष्य दर ३.७५ ते ४ टक्के या पातळीवर नेण्यात आला. या निर्णयानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्या-चांदीच्या किमतींवर दबाव दिसून आला. आंतरराष्ट्रीय बाजारात गुरुवारच्या सुरुवातीच्या व्यवहारात सोन्याच्या दरात मोठी अस्थिरता पाहायला मिळाली. काही टप्प्यांवर सोन्याचा दर ४,३०० डॉलरच्या आसपास आला. चांदीच्या दरातही दबाव दिसून आला. दरम्यान, पुढील काळात सोने-चांदीचे दर कोणत्या दिशेने जातील, यावर अमेरिकेतील व्याजदर, डॉलरची स्थिती आणि महागाईची आकडेवारी यांचा प्रभाव राहण्याची शक्यता आहे.

# जालना जिल्ह्यातील पिकांच्या परिस्थितीचा संकलित प्राथमिक अहवाल शासनास सादर

जालना/प्रतिनिधी : खरीप हंगाम २०२६ मध्ये पर्जन्यमानातील अनिश्चितता तसेच पावसाच्या खंडाचा पिकांच्या परिस्थितीवर परिणाम झाला आहे. १४ सप्टेंबरअखेर जूनपासून जिल्ह्यात झालेला एकूण पाऊस हा या कालावधीतील सरासरी पर्जन्यमानाच्या केवळ ८१.० टक्के झाला आहे. ऑगस्ट महिन्यातही सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला असून, सप्टेंबरमध्ये १४ तारखेपर्यंत सरासरीच्या केवळ ३३.१ टक्के पर्जन्यमानाची नोंद झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील खरीप पिकांच्या परिस्थितीची संयुक्त पाहणी करून जिल्ह्याचा संकलित प्राथमिक अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. जिल्ह्यात निर्माण झालेल्या संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीची बैठक ११ सप्टेंबर २०२६ रोजी घेण्यात आली. या बैठकीत खरीप हंगामातील पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या पिकांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी संयुक्त पीक पाहणी समित्यांची स्थापना करण्यात आली. या समित्यांमध्ये उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी तसेच कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ व विषयतज्ज्ञांचा समावेश करण्यात आला. या संयुक्त समित्यांनी संबंधित तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष क्षेत्रभेटी करून विविध पिकांची सद्यः स्थिती, पावसातील खंडामुळे पिकांवर झालेला परिणाम, पिकांची वाढ व उत्पादनाची संभाव्य स्थिती आदी बाबींची पाहणी केली. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या संयुक्त पीक पाहणी समित्यांनी आपले अहवाल सादर केले असून, त्याआधारे जिल्ह्याचा संकलित प्राथमिक अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.

शासन स्तरावर सदर अहवालाची आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने शासनामार्फत पुढील उपाययोजना करण्यात येणार आहेत. पिकांची सद्यः स्थिती, उपलब्ध पाणीसाठा, पिकांची अवस्था आणि स्थानिक पर्जन्यमानाचा विचार करून कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसार पुढील पीक व्यवस्थापनाचे नियोजन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. तसेच पीकविषयक कोणताही निर्णय घेताना कृषी विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांकडून व तज्ज्ञांकडून प्राप्त (पान ३ वर)

# राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलनासाठी विशेष सर्वेक्षण मोहिमेच आयोजन

जालना/प्रतिनिधी : राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग संक्रमण' हे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जिल्ह्यात कुष्ठरोगाच्या प्रतिबंध, लवकर निदान आणि उपचारासाठी विशेष सर्वेक्षण मोहीम दि. १६ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. मागील पाच वर्षांत निदान झालेल्या कुष्ठरुग्णांच्या कुटुंबीय व निकट संपर्कातील सहवासितांचे सर्वेक्षण तसेच राबविण्यात येणार आहे. समाजातील लपलेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधणे, निदान झालेल्या रुग्णांच्या निकट संपर्कातील व्यक्तींची तपासणी करणे, विशेषतः बाल कुष्ठरोग, सांसर्गिक कुष्ठरोग तसेच श्रेणी १ (Grade-I) व श्रेणी २ विकृती असलेल्या रुग्णांचे प्रमाण कमी करणे आणि संसर्गाची साखळी खंडित करणे, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. उच्च जोखमीच्या भागांवर विशेष लक्ष Focussed Leprosy Campaign अंतर्गत १४ वर्षा खालील कुष्ठरुग्ण आढळण्याची शक्यता असलेली क्षेत्रे, सांसर्गिक (चइ) कुष्ठरुग्णांच्या संपर्कातील सहवासित, मागील पाच वर्षांत कुष्ठरुग्ण आढळलेल्या कुटुंबांतील व्यक्ती, विकृती असलेल्या रुग्णांच्या संपर्कातील सहवासित तसेच कुष्ठरोगाचे प्रमाण जास्त असलेली गावे, पाडे आणि शहरी वॉर्ड यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.



शहरी भागात निवडक क्षेत्रातील सुमारे २०० घरांचा तर ग्रामीण भागात लोकसंख्येनुसार संपूर्ण गाव अथवा संबंधित रुग्णाच्या परिसरातील सुमारे ३०० घरांचा घरभेटीद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. मागील पाच वर्षांतील रुग्णांची यादी तयार करून त्यानुसार सर्वेक्षणाचे नियोजन करण्यात येणार आहे. (पान ३ वर)

# दृष्टी फाउंडेशन तर्फे लोकसेवा आयोगातील गुणवंतांचा सत्कार

परतूर/प्रतिनिधी : दृष्टी फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र लोकसभा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करून पात्र उमेदवारांचा दृष्टी लॉयन्स नेत्रालयात सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दृष्टी फाउंडेशनचे अध्यक्ष मनोहर खालापुरे, संजीवनी खालापुरे ,डॉ. निकिता शिंदे ,डॉ.ज्ञानेश्वर शिंदे, सुनीता खालापुरे, अमित खालापुरे, डॉ . विनायक शिरसाठ ,डॉ.प्रशांत जाधव, डॉ.अर्जुन काटकर, डॉ. स्मिता



तौर यांची प्रमुख उपस्थिती होती. मनोहर खालापूरे यांनी करिअर घडवतांना विद्यार्थ्यांनी आपल्या आई - वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवावी , घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग हा उपेक्षित ,वंचित घटकांची सेवा आणि विकासासाठी करावा असे आवाहन केले. महसूल सहाय्यक पदावर निवड झाल्याबद्दल नंदिनी शिंदे हिचा तसेच वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक पदी निवड झाल्याबद्दल सदाशिव तनपुरे यांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी दोन्ही गुणवंतांचे अभिनंदन करून पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या तसेच सामान्य कुटुंबातून प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी मिळवलेले यश हे तरुणांसाठी प्रेरणादायी आहे .अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

यावेळी नेत्रालयातील कर्मचारी, रुग्ण ,नातेवाईक आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कायदा-सुव्यवस्था व महसूल सुरक्षेसाठी जालना जिल्हा प्रशासनाची धडक मोहीम

जालना/प्रतिनिधी : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करणे तसेच अवैध प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांमार्फत विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते रात्री १२ या कालावधीत प्रादेशिक परिवहन विभाग, पोलीस प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि महसूल विभागाच्या गौण खनिज शाखेमार्फत संयुक्त व स्वतंत्रपणे ही मोहीम राबविण्यात आली. प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाने अंबड-सोलापूर-धुळे महामार्गावर विशेष तपासणी नाका उभारून २५ वाहनांची तपासणी केली. यामध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तीन वाहनांवर दंडात्मक कारवाई करून ७२ हजार रुपयांचा महसूल वसूल करण्यात आला. तपासणीदरम्यान ओव्हरलोड वाहतूक, फिटनेस दाखला नसणे, वाहनचालक परवाना नसणे आणि रिफ्लेक्टर नसणे आदी उल्लंघने आढळून आली. ओव्हरलोड वाहतुकीमुळे महामार्गांचे होणारे नुकसान आणि अपघातांचा धोका लक्षात घेता यापुढे ही कारवाई अधिक तीव्र



करण्यात येणार असल्याचे प्रादेशिक परिवहन विभागाने सांगितले आहे. पोलीस विभागाकडून १३ जणांकडून प्रतिबंधात्मक कारवाई जालना जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलीस प्रशासनानेही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई केली. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १२६ अन्वये सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाच, तर तालुका जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीत आठ अशा एकूण १३ व्यक्तींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईची नोंद करण्यात आली. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर समाजकंटकांवर कठोर नजर ठेवण्यात येत असल्याचे पोलीस विभागाने कळविले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि महसूल विभागाच्या गौण खनिज शाखेच्या पथकांनी जालना, बदनापूर, भोकरदन, जाफराबाद, परतूर, मंठा, अंबड व घनसावंगी तालुक्यांतील प्रमुख रस्ते आणि तपासणी नाक्यांवर दिवसभर गस्त व तपासणी केली. या मोहिमेत अवैध दारू वाहतूक तसेच अवैध वाळू किंवा मुरूम उत्खननाचा कोणताही गैरप्रकार आढळून आला नाही. गेल्या काही दिवसांपासून (पान ३ वर)

# जालना मनपा प्रशासनाचा भोंगळ कारभार!

## भोईपुऱ्यात नाल्यांचे पाणी रस्त्यावर

जालना/प्रतिनिधी : दिनांक १४ सोमवार रोजी सकाळी ११ वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील जुना जालना भागातील प्रभाग क्रमांक १४, भोईपुरा येथे दर ८ ते १० दिवसांनी नाल्या तुंबून पाणी रस्त्यावर येण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. सणासुदीच्या दिवसांतच संपूर्ण परिसरात घाण पाणी साचल्याने नागरिक, महिला आणि शाळकरी मुलांना या दूषित पाण्यातून वाट काढावी लागत आहे. या समस्येकडे मनपा प्रशासन व स्वच्छता निरीक्षक वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमध्ये



तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. परिसरात अंडरग्राऊंड नाल्यांचे काम करताना तांत्रिक चुका झाल्याने ही समस्या कायमस्वरूपी बनली आहे. मुख्य रस्त्यावरील नाल्याची लेव्हल खाली आणि गल्लीतील नाल्याची लेव्हल सुमारे १ फूट वर करण्यात आली आहे. काम सुरू असतानाच संबंधित अभियंते आणि ठेकेदारांनी योग्य लेव्हलकडे लक्ष दिले असते, तर आज ही वेळ आली नसती. मात्र, केलेल्या थातुरमातुर कामाचा मनस्ताप आता स्थानिक रहिवाशांना सहन करावा लागत आहे. सध्या सणांचे दिवस सुरू असतानाच परिसरातील नाल्यांचे चेंबर (पान ३ वर)

# प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी साकारला समर्थ रामदास स्वामी स्थापित ११ मारुतीचा देखावा

जालना/प्रतिनिधी : 'जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे। शहाणे करून सोडावे सकळ जन।।' या समर्थ रामदास स्वामींच्या विचारांना कृतीची जोड देत प्रा. श्रीकांत चिंचखेडकर गेल्या २३ वर्षांपासून ज्ञानदान, शिक्षण, संस्कृती आणि समाजजागृतीच्या क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत आहेत. गणेशोत्सवाच्या माध्यमातून यंदाही त्यांनी जालना शहरातील हरी ओम नगरमधील निवासस्थानी 'श्री समर्थ रामदास स्वामी स्थापित अकरा मारुती' चा भव्य देखावा आणि विद्यार्थ्यांसाठी भूगोल-खगोलशास्त्रावर आधारित प्रात्यक्षिक प्रदर्शन साकारले आहे. अकरा मारुतींच्या प्रतिकृतींच्या माध्यमातून शक्ती, बुद्धी, भक्ती, श्रद्धा, प्रयत्न आणि चिकाटीचा संदेश देण्यात आला आहे.

प्रत्येक व्यक्तीमध्ये सुप्त क्षमता असते; ती ओळखून सातत्यपूर्ण प्रयत्नांनी विकसित करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी, हा या देखाव्यामागील मुख्य हेतू असल्याचे प्रा. चिंचखेडकर यांनी सांगितले. या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे भूगोल विषयावरील १४० संकल्पना आणि ८४ प्रत्यक्ष प्रयोग व प्रात्यक्षिकांचे प्रदर्शन. पृथ्वीची रचना, भूआकार, पर्वत, नद्या, समुद्र, हवामान, पर्यावरण आणि भारताचा भौगोलिक प्रदेश यांसारख्या संकल्पना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजावून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे पाठ्यपुस्तकातील विषय अधिक सहज आणि रंजक पद्धतीने समजण्यास मदत होत आहे. यासोबतच खगोलशास्त्राची स्वतंत्र मांडणी करण्यात आली आहे. भूगोल हा पृथ्वी, तिची रचना आणि तिच्यावर घडणाऱ्या नैसर्गिक व मानवी प्रक्रियांचा अभ्यास करतो, तर खगोलशास्त्रात पृथ्वीच्या पलीकडील सूर्य, चंद्र, ग्रह, तारे, सूर्यमाला, आकाशगंगा आणि विश्वातील खगोलीय घटकांचा अभ्यास केला जातो. विद्यार्थ्यांना या दोन्ही विषयांचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, यासाठी प्रदर्शनाची रचना करण्यात आली आहे. खगोलशास्त्र विभागातील दुर्बिणीच्या माध्यमातून आकाशीय घटकांचे निरीक्षण हे विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. प्रत्यक्ष निरीक्षणामुळे त्यांच्या मनात अवकाश, ग्रह-तारे आणि विश्वाविषयी प्रश्न निर्माण होत असून वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना मिळत आहे. प्रदर्शनातून पर्यावरण संवर्धनाचाही संदेश देण्यात आला आहे. टाकाऊ वस्तूंपासून विविध शैक्षणिक आणि कलात्मक प्रतिकृती तयार करून 'कचऱ्यातून ज्ञान आणि सर्जनशीलता' ही संकल्पना मांडण्यात आली आहे. निसर्गाचे महत्त्व, पर्यावरण संरक्षण आणि उपलब्ध साधनांचा कल्पक वापर याबाबतही जनजागृती करण्यात आली आहे. प्रा. चिंचखेडकर यांनी यापूर्वी विज्ञान व गणित प्रयोगशाळा, भारतातील प्रसिद्ध स्थळे आणि विविध विषयांवरील



शैक्षणिक प्रतिकृती असे अनेक उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतर न करता निरीक्षण, प्रयोग आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिकावे, हा त्यांच्या शैक्षणिक कार्याचा केंद्रबिंदू आहे. गेल्या २३ वर्षांपासून कोणताही स्वार्थ न ठेवता ज्ञानाचा समाजोपयोगी प्रसार करण्याचे कार्य करणाऱ्या प्रा. चिंचखेडकर यांच्या या उपक्रमातून धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांसोबत शिक्षण, विज्ञान व पर्यावरण यांची सांगड घालण्यात आली आहे. हे भूगोल-खगोलशास्त्राचे शैक्षणिक प्रदर्शन विजयादशमी अर्थात दसऱ्यापर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी या उपक्रमाला सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत भेट देऊन प्रयोग व प्रात्यक्षिकांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी केले आहे.